फौ.कि.अर्ज क्र.१७३/२२
पल्लवी माने / सोनाली माने
निशाणी क्र.१०

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० प्रमाणे फिर्यादीचा आदेशिकापुर्व पुरावा साक्षीदार क्र.१**

माझे नाव – हणमंत कृष्णा माने
फिर्यादी पल्लवी हणमंत माने यांचेतर्फे पालकत्व
वडीलांचे नाव – कृष्णा भिमू माने
वय – ६५ वर्षे
व्यवसाय – शेती
राहणार – रा. य.पा.वाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**साक्षीदाराचे सत्यापन शपथेवर सुरु**

१. दिनांक १३/०७/२०२१ रोजी मुलगा गजेंदर हणमंत माने आणि राजेंद्र हणमंत माने या दोन मुलांची लग्ने एकत्रीत झाली. सून सोनाली हिला कसल्याही प्रकारचा त्रास नसताना माझी एक मुलगी मुकबधीर आहे. मी सांगलीला गेलो असताना मला समजले की, माझी सून सोनाली हिने माझ्या मुलीचे हाताची बोटे निकामी केली. त्यानंतर माझ्या मुलाने सांगितले की, आपले घरगुती झाले आहे पोलीस स्टेशनला तक्रार करायला नको. परंतु सोनालीच्या विचित्र वागण्यात काहीच फरक पडत नव्हता. सोनाली हिची आई वंदना बाळू गायकवाड ही सोनाली हिला २४ तास फोन करुन 'तुला कोण त्रास देत असेल तर मी तुला घेवून जाते, त्यांना काय तक्रार करायची आहे ते करु दे' ती अशी चिथावणी देत असते.

२. सोनाली हिचे मावशीचे पती नितीन राजाराम लोंढे, भारती

नितीन लोंढे व तिचे चुलते भाऊसो मनोहर हुबाळे या तिघांनी सोनाली हिला भडकावून अंगावर सोडले व पळून जावू लागली त्यावेळी तिला अटकाव केला असता वरील सर्व लोक आले व तिला जीपमधून घेवून गेले. आम्ही त्यांचा पाठलाग करुन पंढरपूर येथे गेलो. त्यावेळी तिला तिचे मावशीच्या घरी नेले होते. मावशीच्या घरी आम्ही सांगितले की, आम्ही तिला त्रास दिला नाही, तसेच तिने मुलीचा हात मोडला म्हणून काही केलेले नाही, तिला पुन्हा पाठवून द्या. त्यावेळी चंद्रकांत ज्ञानोबा लोंढे हे आम्हाला तिथे मारायला उठले व जरी हात मोडला असेल तरी आम्ही काही करणार नाही असे लिहून द्या असे म्हणू लागले. त्यावेळी समीर अंकुश गाडे यांनी आम्हाला धमक्या द्यायला सुरुवात केली त्यावेळी आम्ही तिथून उठून माघारी आलो. आम्ही रस्त्यात आल्यानंतर माझ्या पत्नीने मला सांगितले की, कपाटाला कुलूप नाही सोनाली ही कपाटातील सोने व पैसे घेवून गेली आहे. त्यावेळी सोनालीची आई वंदना बाळू गायकवाड, तिचे आईचे मामा अंकुश संतू गाडे, रा. कोनेरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर, काका नितीन राजाराम लोंढे, मनोहर भाऊसो हुबाळे, चंद्रकांत ज्ञानोबा लोंढे यांनी सोनाली हिला य.पा.वाडी येथून पळवून नेली आहे. त्याच्या भितीपोटी आम्ही सोनाली हिला पाठवून द्या असे सांगितले असता त्यांनी हात मोडलेची केस करणार नाही असे लिहून द्या असे सांगितले. त्यानंतर आम्ही तिथून निघून आलो. त्यानंतर आम्ही आटपाडी पोलीस स्टेशनला आलो. त्यावेळी ठाणे अंमलदार नितीन बजरंग मोरे हे होते. आम्हाला रात्रीचे १०.३० वाजले होते. त्यांनी फिर्याद लिहून घेतली नाही. त्यामुळे, आम्ही दिनांक १६/०८/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक, सांगली यांचेकडे तक्रारी अर्ज दिला. तक्रार अर्ज दिल्यानंतर पोलीस चौकशीला आले व तुम्ही तक्रार द्यायला विलंब केला असे सांगून तक्रार घेतली नाही. नितीन बजरंग मोरे यांनी सोनाली हिला फोन करुन तुझे सासरे व नवरा फिर्याद द्यायला इथे

आले आहेत, तू तिकडे फिर्याद दे, पोरीचा हात मोडला असला तरी आम्ही तक्रार घेत नाही, तू काळजी करु नको असे सोनालीला सांगितले. त्यानंतर आम्ही तिथून निघून आलो. सोनालीच्या विचित्र वागण्यात कुठेच बदल होईना.

३. आम्ही मळ्याकडे गेलो असताना अवघड जागा दाबला व मुकबधीर मुलीला मारण्याचा प्रयत्न केला. जर तुम्ही मुलीचा हात मोडला अशी तक्रार दिली तर तुम्हाला कोणालाही ठेवणार नाही अशी तिच्या आई व मामाने धमकी दिली. त्यानंतर केवळ नितीन बजरंग मोरे यांच्या सांगण्यावरुन तिला त्रास नसताना तिने आमच्या कुटुंबावर कलम ४९८ प्रमाणे केस दाखल केली. सदर केस केल्यानंतर ती पुन्हा नांदायला आली. तरी देखील आम्ही मुलीविषयी तिच्यावर कोणतीही तक्रार केली नाही. परंतु तिच्या विचित्र वागण्यात कोणताही बदल होत नाही हे पाहून सध्या तिच्यावर तक्रार दाखल केलेली आहे. सध्या ती तिच्या माहेरी आहे. ती तिच्या नातेवाईकांच्या सांगण्यावरुन आम्हाला त्रास देत होती. त्यामुळे, आम्ही त्यांच्याविषयी न्यायालयात तक्रार केली.

**<u>सत्यापन पूर्ण.</u>**

---------------

साक्षीदाराची सही / अंगठा

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR Date: 2024.11.16 16:04:05 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १५/११/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****